# <u>वार्तापत्र</u>

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली. दिनांक ०६/०४/२०१७

## *नक्षल्यांनी पेरुन ठेवलेला भुसुरुंग पोलीसांनी केला निकामी*

मिळालेल्या गोपनिय माहीतीच्या आाधारे उपविभाग अहेरी अंतर्गत उपपोस्टे राजाराम (खां.) हद्दितील आलापल्ली-सिरोंचा मार्गावरील मौजा मौसम गावानजीक आज दिनांक ०६/०४/२०१७ रोजी सी.आर.पी.एफ. बटालियन ०९ अहेरी नक्षलविरोधी अभियानामध्ये शोध मोहीम राबवित असतांना नक्षलवादयांनी पेरुन ठेवलेली स्फोटके जागेवरच निकामी करण्यात आली.

नक्षलविरोधी अभियान राबविणाऱ्या पोलीस पार्टीवर घातपात करण्याच्या उद्देशाने नक्षल्यांनी जमिनीत भुसूरुंग पेरले होते. आलापल्ली-सिरोंचा रोडवरील मौजा मौसम गावानजीक नाल्यावरील पुलाखाली नक्षल्यांनी स्टिलच्या डब्ब्यामध्ये ३ किलो वजनाचे आईडी स्फोटक ेरले होते. पोलीसांच्या सतर्कतेमुळे सदरचा भूसुरुंग निष्क्रीय करण्यात पोलीसांना यश आले. मा. अपर पोलीस अधिक्षक अहेरी श्री. राजा सामी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी अहेरी श्री. गजानन टोम्पे यांचे मार्गदर्शनाखाली बॉम्ब शोधक व नाशक पथकातील अधिकारी व कर्मचारी, प्राणहिता यांनी सदर भूसुरुंगचा नाश केला. पोलीसांना इजा करण्याच्या दृष्टीने आखण्यात आलेला हा नक्षल्यांचा डाव पोलीसांनी उधळून लावला. नक्षलवादयांविरुध्द उपपोस्टे राजाराम (खां.) येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर भागात पोलिसांचे नक्षलविरोधी अभियान अधिक तीव्र करण्यात आले आहे.



